आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार दिनांक २० फेब्रुवारी २०२५

ठळक बातम्या

1. उद्यापासून दिल्लीत सुरू होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला एकूण ४ कोटी रुपयांचा निधी देण्याचा राज्य सरकारचा निर्णय.
2. शेगावसह विदर्भात संत गजानन महाराजांचा १४७ वा प्रकटदिन उत्साहात साजरा.
3. यवतमाळ जिल्ह्यात गेल्या वीस वर्षापासून वास्तव्यास असलेल्या नक्षलवाद्याला स्थानिक पोलिसांकडून अटक.
4. विदर्भ आणि मराठवाडा प्रांतातील निवृत्ती वेतनधारकांना जीपीएफ खात्यातील शिल्लक आणि इतर तपशील आता ऑनलाइन पाहण्याची सुविधा उपलब्ध.

---------------------------------

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उद्यापासून दिल्लीत सुरु होत आहे. डॉ. तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार्या या संमेलनाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित असतील. दिल्लीतल्या तालकटोरा स्टेडियम मध्ये छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात, मान्यवरांच्या मुलाखती, बहुभाषिक कवी संमेलन, विविध विषयावर परिसंवाद, असे कार्यक्रम होणार आहेत. दरम्यान, राज्य सरकारनं या साहित्य संमेलनाला एकूण ४ कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी साहित्य संमेलनासाठी २ कोटी रुपये दिले जातात. मात्र या संमेलनाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. साहित्यिक आणि साहित्य रसिकांवरचा वाढलेला खर्च, संमेलनाचं वेगळेपण यासारख्या कारणांमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संमेलनासाठी अतिरीक्त २ कोटी रुपये द्यायला विशेष बाब म्हणून मंजुरी दिली.

---------------------------------

## प्रगट दिन

विदर्भाची पंढरी म्हणून ओळख असलेल्या बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव इथल्या संत गजानन महाराजांचाआज १४७ वा प्रकटदिन आज अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा होत आहे. संत गजानन महाराज पहिल्यांदा १८७८ च्या फेब्रुवारी महिन्यात माघ कृष्ण सप्तमीला शेगाव इथं दिसले होते, हा दिवस गजानन महाराजांचा प्रकट दिन म्हणुन दरवर्षी राज्यभर विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा केला जातो. या निमित्त राज्यभरातून लाखो भावीक गजानन महाराजांच्या दर्शनासाठी शेगावमध्ये दाखल झाले आहेत. 'गण गण गणात बोते'च्या नामात संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनानिमित्त राज्यभरातून हजारो वारकरी दिंड्या शेगाव नगरीमध्ये दाखल झाल्या आहेत. गजानन महाराजांचं दर्शन घेण्यासाठी भक्तांची सकाळ पासुनच शेगाव नगरीमध्ये रिघ लागली असून गर्दी बघता गजानन महाराजांचं आज २४ तास सुरू राहणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातही ठिकठिकाणी गजानन महाराजांचा प्रगट दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांसह महाप्रसादाचं आयोजनही करण्यात आल आहे. नागपुरातील संत गजानन महाराज मंदिरात सकाळ पासूनच भाविकांनी त्यांच्या दर्शनासाठी गर्दी केलेली दिसत आहे. नागपुरातील संत गजानन महाराज मंदिर झेंडा चौक महाल नागपूर येथील मंदिराच्या वतीने महाराजांची पालखी आणि शोभायात्रा काढण्यात आली. अनेक मंदिरांमध्ये आज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

---------------------------------

## ग्रीन शिपिंग कॉन्क्लेव

'ग्रीन शिपिंग कॉन्क्लेव २०२५'चं आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेचे महासचिव आर्सेनिओ डॉमनिग्झ आणि केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकूर यांच्या उपस्थितीत आज उद्घाटन मुंबईतल्या पवई इथं करण्यात आलं. कार्बन उत्सर्जन कमी करण्यात या परिषदेचे महत्व शंतनू ठाकूर यांनी सांगितले....

*तो हम लोग चाहते हैं पूरा वर्ल्ड इंफ्रास्ट्रक्चर कैसे चल रहा है ग्रीन शिपिंग के लिए इसलिए आईओएम ने भी आज जॉइन किया। इधर हम लोगों को समझने में ये सुविधा होगा कि फेस्टिवल कंट्रीज़ कैसे इसको यूज़ करते हैं तो आई थिंक हम लोगों का जो टारगेट है के 45% कार्बन एमिशन हम लोग रिड्यूस करेंगे तो उन्होंने अप्रीशीएट किया कि उन लोगों का टारगेट 25-27% है।*

----------------------------------

**रेखा गुप्ता**

दिल्लीच्या नवीन मुख्यमंत्री म्हणून रेखा गुप्ता यांनी आज शपथ घेतली. दिल्लीतल्या रामलीला मैदानावर झालेल्या या शपथग्रहण सोहळ्यात दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही के सक्सेना यांनी, गुप्ता यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. प्रवेश वर्मा यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा, विविध केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री यावेळी उपस्थित होते. पदभार स्वीकारल्यावर त्यांनी विकसीत दिल्ली करण्याचा संकल्प बोलून दाखवला

*आज हम सचिवालय में आ के मुख्यमंत्री कार्यालय में मैंने चार्ज भी संभाल लिया है और शाम को तुरंत आज की डेट में कैबिनेट की मीटिंग भी रख ली गई है। जो मिशन विकसित दिल्ली का है उसको पूरा करने के लिए।लगातार काम किया जाएगा। एक भी दिन उसमें से व्यर्थ नहीं होगा और एक एक कमिटमेंट जो हमारी दिल्ली से है, उसे पूरा करेंगे।*

दरम्यान, रोहिणी विधानसभा क्षेत्रातून निवडून आलेले विजेंद्र गुप्ता यांची दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आल्याचं याबाबातच्या वृत्तात म्हटलं आहे.

----------------------------------

**रालोआ मुख्यमंत्री बैठक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली येथे एनडीएच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची बैठक घेतली. या बैठकीला केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह आणि जे.पी.नड्डा देखील उपस्थित होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन कल्याण, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य आणि बिहारचे उपमुख्यमंत्री विजय सिंह आदी उपस्थित होते.

----------------------------------

**नक्षल अटक**

**यवतमाळ जिल्हयात गेल्या वीस वर्षापासून वास्तव्यास असलेल्या नक्षलवाद्याला जिल्हयातल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे . तुलसी उर्फ दिलीप महतो असं या नक्षलवाद्याचं नाव आहे. १९९३ पासून तो झारखंडमध्ये नक्षल चळवळीत सक्रिय होता. तर १९९९ मध्ये भीतीया दलमचा तो विभागीय कमांडर म्हणून कार्यरत झाला. एकूण बारा सशस्त्र नक्षलवाद्यांच्या गटांचं तो नेतृत्व करीत होता. महराष्ट्रात दाखल झाल्यानंतर त्याने काही दिवस मोलमजुरी करून काम केलं. त्यानंतर त्यानं यवतमाळ जिल्हयात बनावट कागदपत्र तयार करण्यास सुरुवात केली. यामध्ये त्यानं आधार कार्डसह खोटे परवाने तयार केले. यवतमाळ पोलिसांना याबाबतची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला सापळा रचून अटक केली . याबाबत यवतमाळचे जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली......**

***ते नक्षल आपल्याकडे 2004 पासून आता पर्यंत ते यवतमाळ जिल्हयामध्ये राहात होता. आपल्याला  दोन महिन्यापूर्वी काही गोपनीय माहिती मिळाली की इथे एक नक्षल राहतात म्हणून पण आपल्याला पूर्ण डीटेल नाही मिळाला होता त्याच्यावर आपण स्पेशल इंटरेस्ट घेऊन वर्कआउट केले ह्यूमन आणि टेक्निकल इंटेलिजेन्स वापर करून आतापर्यंत आपण ते डेवलप करून त्यानंतर आपण झारखंडच्या पोलिस सोबत को-ओरडीनेशन करून त्याच्यानंतर त्याच्याकडून कन्फर्मशन पण घेतले त्यांच्या टीम लापाठवण्यासाठी सांगितले. ते आल्यानंतर आपण त्या आरोपीला अटक करून झारखंडच्या पोलिसच्या ताब्यात दिले आहे.***

---------------------------------

**जीपीएफ**

**महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांना जीपीएफ खात्यातील शिल्लक आणि इतर तपशील आता ऑनलाइन पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रधान महालेखापाल कार्यालयाच्या** cag.gov.in/ae/nagpur/en **या अधिकृत संकेतस्थळावर ही सुविधा उपलब्ध असल्याची माहिती प्रधान महालेखापाल जया भगत यांनी दिली. या सुविधेमुळे महाराष्ट्र राज्य सरकारच्या विदर्भ आणि मराठवाडा प्रांतातील निवृत्तीवेतनधारक आणि सामान्य भविष्य निर्वाह निधी (जीपीएफ) अभिदात्यांना याचा लाभ घेता येईल. याचबरोबर सामान्य भविष्य निर्वाह निधीच्या जी.पी.एफ.**

स्लिप्स सहजपणे डाउनलोड करू शकतील. गत ५ वर्षांच्या जीपीएफ स्लिप्स देखील ऑनलाइन उपलब्ध असल्याचे नमूद केले आहे.

---------------------------------

ओटीटी मार्गदर्शक तत्वे

ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर सादर होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये भारतीय कायदे आणि नीती संहितेचं पालन केलं जावं, अशी सूचना माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं केली आहे.या संदर्भात मंत्रालयानं मार्गदर्शक तत्व आणि डिजीटल मिडीया नीती संहिता नियम जारी केले आहेत.त्याशिवाय ओटीटी प्लॅटफॉर्म्सच्या स्वयंनियमन मंडळांनी अशा आचारसंहितेचं उल्लंघन झाल्यास त्याविरोधात स्वत:हून कारवाई करावी, अशी अपेक्षाही मंत्रालयानं व्यक्त केली आहे.

---------------------------------

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे

राज्याचे कृषिमंत्री आणि सिन्नरचे आमदार माणिकराव कोकाटे यांना नाशिकच्या जिल्हा न्यायालयाने दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. 1995 ते 1997 कालावधीमध्ये माणिकराव कोकाटे यांनी आपल्याला स्वतःचे घर नसल्याचे खोटे कागदपत्र देऊन नाशिकच्या बॉईज टाऊन परिसरातील उच्चभ्रू वस्तीमध्ये मुख्यमंत्री कोट्यातून घर मिळवले होते.

---------------------------------